कार्यासन वि.जी.स.क.अ.
नागपूर
आवक क्र. २०८
30 MAR 2011
वि.जी.स.क.अ. का.अ.



**गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेमध्ये सुधारणा करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**

**शासन निर्णय क्रमांकः इबीसी २००८/प्र.क्र.२०७/मावक-२**

**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक १४ फेब्रुवारी,२०११**

**वाचा : १) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक-विघयो-१०९७/ प्र.क्र. १७५/ मावक-२, दि. ३१/१२/१९९७**

**२) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक-विघयो-२००५/ प्र.क्र. १५१ मावक-२, दि. २३/११/२००६**

**३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-विघयो-२००५/ प्र.क्र. १५१/मावक-२, दि. २८/१२/२००६**

**४) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-गटई-२००६/ प्र.क्र. २०९/मावक-२, दि. २१/६/२००७**

**५) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-गटई-२००६/ प्र.क्र. २०९/मावक-२, दि. १३/२/२००८**

**६) शासन शुध्दिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-गटई-२००६/ प्र.क्र. २०९/मावक-२, दि. २४/१२/२००८**

**७) शासन शुध्दिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-गटई-२००६/ प्र.क्र. ३०७/०७/भाग-१/ मावक-२, दि. ६/७/२००९**

<u>प्रस्तावना</u> : महाराष्ट्र राज्यामध्ये चामडयाच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर अनुसूचित जाती प्रवर्गातील व्यक्ती असून, त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न यांच्याशी निगडीत आहे. हे पादत्राणे दुरुस्ती करणारे व्यावसायिक हे रस्त्याच्या कडेला उन्हातान्हात बसून आपली सेवा देत असतात. या व्यावसायिकांना ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण मिळावे व त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ग्रामपंचायत नगरपालिका क्षेत्रात १०० टक्के अनुदानावर गटई कामगारांना गटई स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय दि.३१/१२/१९९७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजना सन २००२-०३ पर्यत शासनामार्फत राबविण्यात येत होती.

सन २००३-०४ पासून ही योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांचेकडे सोबविण्यात आली. तथापि, सन २००३-०४ व २००४-०५ या वर्षात महामंडळाला ही योजना राबविता आलेली नाही. त्यामुळे सन २००५-०६ पासून ही योजना शासनाकडून राबविण्याचा निर्णय झाला होता. तथापि, शासनामार्फत सदर योजना राबविण्यामध्ये अडचणी आल्याने ही योजना पुन्हा सन २००६-०७

पासून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांचेमार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यास अनुसरुन महामंडळामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी प्रत्यक्षात संचालक,समाज कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत होत असल्याने सदर योजना संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. .

**शासन निर्णय :** राज्यातील गटई कामगारांना ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी याकरिता ग्रामपंचायत नगरपालिका व महानगरपालिका व छावणी क्षेत्रात (कॅन्टोमेंट बोर्ड) क्षेत्रात १०० टक्के शासकीय अनुदानातून पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना यापुढे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांच्याऐवजी संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचेमार्फत राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेच्या सध्याच्या नियम व अटी यामध्ये कोणताही बदल नाही.

२. संचालक, समाज कल्याण संचालनालय यांनी सन २०१०-११ मध्ये गटई स्टॉलचा पुरवठा करण्याबाबतची निविदा प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी.

३. याबाबत होणारा खर्च "२२२५ - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास वर्ग यांचे कल्याण ०१ -अनुसूचित जातीचे कल्याण, १०२ - आर्थिक विकास पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना (०३) (०२) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना (२२२५ २६२ २) ३१ सहाय्यक अनुदान,मागणी क्रमांक एन २" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून त्याखाली केलेल्या वित्तीय तरतूदीमधुन भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक- २०११०२१४१६४१०३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दिनेश वाघमारे )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.मुख्यमंत्र्याचे सचिव
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव

मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग, मुंबई

अध्यक्ष, सफाई कर्मचारी आयोग, महाराष्ट्र, मुंबई

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे

व्यवस्थापकीय संचालक, लिडकॉम, मुंबई

संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई

महासंचालक, माहिती व जनसंपक महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी

सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी

सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ जिल्हा परिषद

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

निवासी लेखा परिक्षक, मुंबई

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

सर्व महानगरपालिका/ नगरपालिका/ जिल्हा परिषद/ कॅन्टोमेंट बोर्ड

सर्व उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई

संगणक कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई (शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीकरीता)

निवड नस्ती - मावक-२.